आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.२० वाजता
०९ मे २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्तान सीमेवरच्या तणावासंदर्भात भारतात सरकारची वेगवान पावलं

- वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतात संरक्षण यंत्रणा सतर्क/ विविध विभागांचे दिशानिर्देश जारी

- भारताच्या ऑपरेशन सिंदूरला जगभरातून पाठिंबा

- सीमाभागातल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आयपीएल क्रिकेट सामने आठवडाभरासाठी स्थगित

**आणि**

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या पदकतालिकेत महाराष्ट्र अव्वल स्थानी कायम

**<><><><><>**

पाकिस्तान बरोबरच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सरकारने वेगवान पावलं उचलली आहेत. विविध स्तरांवर संरक्षण विषयक मुद्यांवर चर्चा होत असून महत्त्वाचे निर्णय घेतले जात आहेत. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून……

**होल्ड व्हाईस कास्ट…..**

*देशाच्या पश्चिम सीमेवरची सशस्त्र दलांच्या सज्जतेचा आढावा घेण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. संरक्षण दलांचे प्रमुख जनरल अनिल चौहान, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी, हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह या बैठकीला उपस्थित होते.*

*केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची आज सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. राष्ट्रीय संरक्षण सल्लागार अजित दोवाल,*

*केंद्रीय विमानतळ सुरक्षा दलाचे महासंचालक केंद्रीय गृहखात्याचे सचिव आणि इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीत उपस्थित होते.*

*पाकिस्तानबरोबरच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर देशात जीवनावश्यक वस्तू आणि सेवांचा पुरवठा सुरळीत रहावा याकरता केंद्रसरकारने सर्व प्रकारची तयारी केली आहे. देशातल्या बँका आणि इतर वित्तीय संस्थांच्या सायबर सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज बैठक बोलावली आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांची  एटीएम, रोकड जमा करण्याची आणि काढून घेण्याची यंत्रं तसंच सर्व डिजिटल सेवा पूर्णपणे कार्यरत असल्याची माहिती संबंधित बँकांच्या व्यवस्थापनानं दिली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज आरोग्य आणि  औषधोपचार सुविधांची सज्जता पाहण्याकरता उच्चस्तरीय बैठक घेतली.*

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, वृत्तवाहिन्या, डिजिटल मंच आणि वार्ताहरांनी भारतीय सशस्त्र दलांच्या हालचाली आणि कारवायांचं थेट प्रक्षेपण करू नये, अशी सूचना संरक्षण मंत्रालयानं आज केली. अशी संवेदनशील आणि गोपनीय माहिती प्रसारित केल्यामुळे सशस्त्र दलांच्या कामात अडथळा येऊन नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो, असं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

दरम्यान, पाकिस्तानच्या या हल्ल्यामुळे राजस्थान, पंजाब, जम्मू काश्मीर, चंदीगढ, हिमाचल प्रदेशसह काही राज्यांमध्ये विमान उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. देशभरातले विमानतळ बंद केल्याच्या वृत्ताचं मात्र नागरी उड्डयन मंत्रालयानं खंडन केलं आहे.

पाकिस्तानकडून आज पुन्हा ड्रोन हल्ल्याची शक्यता लक्षात घेऊन चंदीगढमध्ये सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. नागरीकांना घरातच राहण्याची सूचना हवाई दलानं केली आहे.

<><><><>

नियमित सैन्याला पाठिंबा देण्यासाठी आणि सहाय्य करण्यासाठी प्रादेशिक सैन्यातले जवान आणि अधिकाऱ्यांना बोलावण्याचे अधिकार केंद्र सरकारने लष्करप्रमुखांना दिले आहेत. प्रादेशिक सैन्याच्या ३२ पैकी १४ बटालियन दक्षिण कमांड, पूर्व कमांड, नैऋत्य कमांड, अंदमान आणि निकोबार कमांड आणि आर्मी ट्रेनिंग कमांड या क्षेत्रात तैनात करण्याची अधिसूचना संरक्षण मंत्रालयानं काढली आहे. ९ फेब्रुवारी २०२८ पर्यंत हा आदेश लागू असेल.

<><><><>

भारताच्या उत्तर आणि पश्चिम भागातल्या अनेक शहरांवर हल्ला करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न भारतीय सेनादलांनी काल रात्री हाणून पाडला. जम्मू सतवारी, सांबा, आर एस पुरा आणि आर्निया इथं पाकिस्तानच्या दिशेनं आलेली ८ क्षेपणास्त्र मधेच रोखून निकामी करण्यात आली. सीमासुरक्षा दलानं काल जम्मू काश्मीरच्या सांबा जिल्ह्यात घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडला. त्यात किमान ७ दहशतवादी मारले गेले.  दरम्यान संघर्ष वाढवण्याची भारताची अजिबात इच्छा नसल्याचं केंद्रसरकारने स्पष्ट केलं आहे. पाकिस्तान कुरापती काढत असल्यानं त्याला चोख उत्तर देत असल्याचं सरकारने म्हटलं आहे.

<><><><>

देशात इंधनाचा पुरेसा साठा असून त्याचं वितरणही सुरळीत सुरू असल्याची माहिती इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड- IOCLनं दिली.  नागरिकांनी घाबरून

न जाता इंधनाचा अतिरीक्त साठा करू नका आणि अनावश्यक गर्दी टाळा असं आवाहनही IOCL नं केलं आहे. देशातल्या सर्व केंद्रांवर इंधन आणि एलपीजीचा पुरेसा साठा असल्याचंही आयओसीएलनं सांगितलं आहे.

<><><><>

भारताच्या ‘ऑपरेशन सिंदूर’ला जागतिक समुदायानं पूर्ण पाठिंबा दिला आहे. अमेरिका, यूके, इस्त्रायल, सौदी अरेबिया, कतार आणि संयुक्त अरब अमिरातींनी भारताच्या भूमिकेचं समर्थन केलं आहे. युरोपीय संघ आणि सर्व २७ सदस्य देशांनी यासंदर्भात एक संयुक्त निवेदन जारी केलं आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताचं समर्थन करताना, संयम ठेवायची आणि चर्चेतून मार्ग काढायची सूचना केली आहे. रशियानंही संयम बाळगण्याचं आवाहन केलं आहे.

<><><><>

भारत पाकिस्तानदरम्यान तणावाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत राज्यसरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सर्व रजा पुढच्या आदेशापर्यंत रद्द केल्या आहेत. हा निर्णय सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणि आपत्ती प्रतिसाद प्रणालीची तयारी सुनिश्चित करण्याच्या आवश्यकतेनुसार घेतला गेला असल्याचं याबाबतच्या अधिकृत आदेशात म्हटलं आहे.

<><><><>

तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंन्टट्स ऑफ इंडिया या संस्थेने आपल्या काही परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. आजपासून येत्या १४ मे पर्यंत होणाऱ्या सीए फायनल, इंटरमिडिएट, पोस्ट क्वालिफिकेशन कोर्स आणि सेल्फ पेस्ड ऑनलाईन मोड्युल या परीक्षा आता पुढे ढकलण्यात आल्या असून लवकरच नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असं संस्थेने पत्रकाद्वारे कळवलं आहे.

**<><><><><>**

मुंबई मेट्रो तीनच्या बीकेसी ते वरळीमध्ये आचार्य अत्रे चौकापर्यंतच्या ९ किलोमीटरच्या पल्ल्याचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज झालं. या मार्गिकेचं काम अतिशय वेगानं झालं असून आचार्य अत्रे चौकापासून कफ परेडपर्यंतचा टप्पा यंदा ऑगस्ट महिन्यापर्यंत पूर्ण करून जनतेसाठी खुला करण्याचं सरकारचं ध्येय असल्याची माहिती फडणवीस यांनी यावेळी वार्ताहरांशी बोलताना दिली. ही मार्गिका अभियांत्रिकी क्षेत्रातला एक चमत्कार असल्याचं ते म्हणाले. आत्तापर्यंत सुरू असलेल्या मेट्रो मार्गिकांना चांगला प्रतिसाद मिळत असून काम पूर्ण झाल्यानंतर तो वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

आपण भारतीय शांतताप्रिय आहोत, युद्ध आपला रस्ता नाही, मात्र आपल्यावर हल्ला झाला तर संरक्षणाची जबाबदारी आपण घेतो, असं प्रतिपादन माजी संरक्षण मंत्री शरद पवार यांनी केलं. सातारा इथं कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय सैन्यदलाच्या कामगिरीचा अभिमान वाटतो असंही पवार म्हणाले. पूर्वी सैन्य दलात महिलांना स्थान नव्हतं. मात्र आपल्या संरक्षण मंत्रीपदाच्या कार्यकाळात महिलांना सैन्यदलात ९ टक्के आरक्षण दिला, याचं स्मरण पवार यांनी केलं. महिलांना सैन्यदलात समाविष्ट करण्याचा निर्णय महिला अधिकाऱ्यांनी सार्थ ठरवल्याचं पवार म्हणाले.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या काही बातमीपत्रांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार दुपारी ३चं प्रादेशिक बातमीपत्र ३ वाजून २० मिनिटांनी, संध्याकाळी पाच वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र ५ वाजून २०

मिनिटांनी तर रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल. आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा कार्यक्रम वृत्तविशेष आणि अर्थविशेष संध्याकाळी सव्वासात ऐवजी रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हे बदल कायम राहतील.

**<><><><>**

भारत आणि पाकिस्तान दरम्यान वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आयपीएलचे आजपासून पुढचे सर्व सामने आठवडाभरासाठी स्थगित केले आहेत. त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन संबंधितांशी चर्चा करून स्पर्धेचं पुढचं वेळापत्रक जाहीर केलं जाईल, असं बीसीसीआयनं स्पष्ट केलं. सद्यस्थितीत बीसीसीआय देशासोबत खंबीरपणे असून, भारत सरकार, सशस्त्र दल आणि देशवासीयांच्या पाठीशी असल्याचं पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत काल महाराष्ट्रानं पदकांचं अर्धशतक पूर्ण करत पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम राखलं. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आतापर्यंत २० सुवर्ण, १८ रौप्य आणि १६ कांस्य अशी एकंदर ५४ पदकं पटकावली आहेत. सायकलिंग स्पर्धेत ३ सुवर्णपदकांसह ६ तर मल्लखांब स्पर्धेत २ सुवर्ण पदकांसह ९ पदकं कमवून महाराष्ट्रानं उपविजेतेपद मिळवलं. जलतरणात सर्वाधिक १९ पदकं महाराष्ट्रानं जिंकली आहेत. तिरंदाजीमध्ये ६ सुवर्ण पदकांसह ९ पदकांची विक्रमी कामगिरी महाराष्ट्रानं केली तर कबड्डीमध्ये रौप्य पदक मिळवलं.

**<><><><>**

अमेरिकेचे रॉबर्ट फ्रांसिस प्रिवोस्ट यांची नवे पोप म्हणून निवड झाली आहे. कॅथोलिक चर्चच्या इतिहासात पोप बनलेले ते पहिले अमेरिकन व्यक्ती आहेत. नवे पोप लियो चौदावे या नावाने ओळखले जातील. काल सिस्टीन चॅपेलमध्ये झालेल्या मतदानानंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनतेच्यावतीनं फ्रांसिस प्रिवोस्ट यांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या नेतृत्वात शांती, सौहार्द, एकता वाढीस लागो, असं प्रधानमंत्री आपल्या समाज माध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हणाले आहेत.

//<><><><><>//